आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२० नोव्हेंबर २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींना वेळेची मर्यादा घालता येणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- जी ट्वेंटी परिषदेसाठी प्रधानमंत्री उद्यापासून दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर

- बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नीतीशकुमार यांनी १०व्यांदा घेतली शपथ

**आणि**

- ५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून गोव्यात प्रारंभ

**<><><><><>**

विधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींना वेळेची मर्यादा घालता येणार नही असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या नेतृत्वाखालील ५ न्यायाधीशांच्या संविधान पीठाने आज हा निवाडा दिला. संविधानातल्या या पेचावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागितला होता. त्यावर संविधान पीठानं असं म्हटलंय की विधीमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपालांना विलंब होत असेल तर सर्वोच्च न्यायालयाला त्या प्रकरणी हस्तक्षेप करुन विलंब टाळायला सांगता येईल. विधेयकातल्या तरतुदी मान्य नसल्यास राज्यपालांना ते विधानसभेकडे परत पाठवता येतं किंवा राष्ट्रपतींकडे मार्गदर्शनासाठी पाठवता येतं.

सरन्यायाधीशांखेरीज न्यायमूर्ती सूर्यकांत, विक्रम नाथ, पी एस नरसिंहा आणि अतुल चांदुरकर या पीठाचे सदस्य होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २१ ते २३ नोव्हेंबर दरम्यान दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्ग इथं होणाऱ्या २०व्या जी-20 नेत्यांच्या शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. ग्लोबल साउथमध्ये होणारी ही सलग चौथी जी-20 शिखर परिषद आहे. या परिषदेत प्रधानमंत्री मोदी जी-20 कार्यक्रमपत्रिकेबाबत भारताची भूमिका मांडतील, असं परराष्ट्र मंत्रालयानं एका

निवेदनात म्हटलं आहे. या शिखर परिषदेच्या निमित्ताने तिथं आलेल्या जागतिक नेत्यांबरोबर प्रधानमंत्र्यांच्या द्विपक्षीय बैठका होतील. दक्षिण आफ्रिकेने आयोजित केलेल्या भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका संघटनेच्या नेत्यांच्या बैठकीतही सहभागी होतील, असंही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

सागरी सीमांनी जोडलेल्या देशांनी आपल्या प्रदेशातलं स्थैर्य आणि सुरक्षितता सुनिश्चित करणं गरजेचं असल्याचं प्रतिपादन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत होत असलेल्या कोलंबो सुरक्षा परिषदेच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या सातव्या बैठकीत बोलत होते. वेगाने बदलणाऱ्या आणि आव्हानात्मक असलेल्या जागतिक सुरक्षेच्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची असल्याचं ते म्हणाले. मालदीव, मॉरिशस, श्रीलंका आणि बांगलादेश यांसारख्या सदस्य देशांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार या बैठकीत सहभागी झाले आहेत. या बैठकीत सागरी सुरक्षा, दहशतवाद आणि कट्टरतावादाचा मुकाबला, आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी, सायबर सुरक्षा, महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे संरक्षण, मानवतावादी सहाय्य आणि आपत्ती निवारण अशा विविध विषयांवर चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

भारतानं संयुक्त अरब अमिराती अर्थात युएईच्या नागरिकांसाठी कोचीन, कालिकत आणि अहमदाबाद आंतरराष्ट्रीय विमानतळांवर व्हिसा-ऑन-अरायव्हल सुविधा उपलब्ध केली आहे. यामुळं आता युएईच्या नागरिकांना आता भारतातील नऊ प्रमुख विमानतळांवर ही सुविधा उपलब्ध झाली आहे. पूर्वी ही सुविधा नवी दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरू, हैदराबाद आणि कोची इथं उपलब्ध होती. युएईच्या ज्या नागरिकांनी पूर्वी भारतीय ई-व्हिसा किंवा नियमित कागदी व्हिसा मिळवला आहे, त्यांच्यासाठीच ही योजना असून, या योजनेअंतर्गत ते ६० दिवसांपर्यंत भारतात राहू शकतात. या व्हिसासाठी अर्जदारांकडे किमान सहा महिन्यांची वैधता असलेला पासपोर्ट असणे आवश्यक आहे. पर्यटन, व्यवसाय किंवा वैद्यकीय कारणांसाठी भारतात येणाऱ्या युएईच्या नागरिकांचे प्रमाण वाढत आहे, त्यांना सहजपणे भारतात येणं शक्य व्हावं, दोन्ही देशांमधले संबंध दृढ व्हावेत, या उद्देशानं ही सुविधा देण्यात आली आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात पुन्हा एकदा काळजीवाहू सरकार प्रणाली लागू करण्याचा निर्णय तिथल्या सर्वोच्च न्यायालयाच्या अपिलीय विभागाने दिला आहे. १४ व्या सार्वत्रिक निवडणुकीपासून काळजीवाहू सरकार प्रणाली लागू होईल. १० मे २०११ ला सर्वोच्च न्यायालयाने काळजीवाहू सरकार प्रणाली बंद केली होती. या निर्णयाचा येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीवर काहीही परिणाम होणार नाही असं न्यायालायनं सांगितलं. याआधी १९९६, १००१ आणि २००८ मधे काळजीवाहू सरकार असतानाच निवडणूका झाल्या होत्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० नोव्हेंबरला आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२८वा भाग असेल.

या कार्यक्रमासाठी काही सूचना असल्यास त्या 1800 11 7800 या टोलफ्री क्रमांकावर कळवता येतील. याखेरीज नमोॲप आणि मायगव्ह ओपन फोरवर देखील संपर्क साधता येईल. येत्या २८ नोव्हेंबरपर्यंत सूचना देता येतील.

**<><><><><>**

बिहारमधे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नव्या सरकारचा शपथविधी समारंभ आज झाला. यात संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीश कुमार यांनी दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री (नितीश ० ते ०.१६) - -**

त्यांच्यासोबत सम्राट चौधरी, विजयकुमार सिन्हा, मंगल पांडे, नितीन नबीन, रामकृपाल यादव, श्रेयसी सिंह यांच्यासह २७ मंत्र्यांनी पद आणि गोपनियतेची शपथ घेतली. पाटणा इथं गांधी मैदानावर झालेल्या या शपथविधी सोहळ्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. तसंच हा सोहळा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

नुकत्याच झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं २४३ पैकी २०२ जागा जिंकत दणदणीत विजय मिळवला आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अर्थसंकल्पपूर्व नववी बैठक घेतली. यात त्यांनी पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्रातल्या व्यावसायिक आणि तज्ज्ञांशी चर्चा केली. यावेळी अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, अर्थ मंत्रालयाच्या सचिव अनुराधा ठाकूूर आणि पर्यटन मंत्रालयाचे मुख्य आर्थिक सल्लागार ज्ञानेश भूषण उपस्थित होते.

अर्थमंत्र्यांनी काल माहिती तंत्रज्ञान, बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी अर्थसंकल्पपूर्व बैठकीत चर्चा केली.

**<><><><><>**

ऑनलाईन खरेदी व्यवहारात ग्राहकांच्या हिताचं रक्षण करण्याच्या उद्देशाने देशातल्या २६ ई कॉमर्स संकेतस्थळांनी डार्क पॅटर्न प्रतिबंध आणि नियमन मार्गदर्शक तत्वांचं पालन करत असल्याची स्वघोषणापत्र सादर केली आहेत. ऑनलाईन खरेदी करताना विविध पद्धतीने होणारी ग्राहकाची दिशाभूल, सबस्क्रिप्शन संदर्भातली फसवेगिरी आणि फसव्या जाहिराती या सर्व बाबी डार्क पॅटर्न प्रकारात येतात. आपल्या संकेतस्थळावर ग्राहक सुरक्षितपणे खरेदी करू शकतील, त्यांना कोणत्याही प्रकारच्या डार्कपॅटर्नचा सामना करावा लागणार नाही, असं या घोषणापत्रात नमूद असल्याचं ग्राहक व्यवहार मंत्रालयाने यासंबंधीच्या आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

विद्यार्थांना शैक्षणिक सामग्री, प्रवेश अर्ज आणि तत्सम कागदपत्रं पाठवण्यासाठी आता भारतीय टपाल सेवेनं विशेष स्टुडंट मेल योजना सुरू केली आहे. या योजनेत विद्यार्थ्यांना टपाल सेवेच्या शुल्कावर १० टक्के सूट मिळणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना आपल्या संबंधित शैक्षणिक संस्थेचं विद्यार्थी ओळखपत्र आणि त्याची एक प्रत टपालासोबत टपाल कार्यालयात सादर करावी लागेल. तसंच, आपल्या लिफाफ्यावर स्टुडंट मेल असं स्पष्टपणे लिहावं लागेल. संबंधित पोस्ट ऑफिस कर्मचारी ओळखपत्राची पडताळणी करेल आणि त्यानंतर शुल्कावरची सूट लागू होईल, असं टपाल विभागानं कळवलं आहे.

**<><><><><>**

५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव–इफ्फीला आजपासून गोव्यात पणजी इथं सुरुवात होत आहे. यावर्षीच्या इफ्फीची सुरुवात एका विशेष पथसंचलनातून होणार असून, त्यात विविधरंगी चित्ररथ, लोकगीतं आणि ‘भारत एक सूर’ या कार्यक्रमाचा

समावेश आहे. येत्या २८ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात ८१ देशातल्या २४० चित्रपटांचं प्रदर्शन होणार आहे. सुवर्णमयूर पारितोषिकासाठी १५ चित्रपटांना मानांकन असून, यामध्ये "गोंधळ" या मराठी चित्रपटाचा समावेश आहे. या महोत्सवात ज्येष्ठ अभिनेते रजनीकांत यांच्या चित्रपट कारकिर्दीला ५० वर्ष होत असल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेन आणि एचएस प्रणॉय यांनी पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. सिडनी इथं काल झालेल्या सामन्यात लक्ष्य सेननं चिनी तैपेईच्या सु ली-यांगचा पराभव केला, तर एचएस प्रणॉयनं इंडोनेशियाच्या मार्सेलीनोचा पराभव केला.

**//<><><><><>//**